| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| CNR No. MHTH120018882020 | दाखल तारीख | : | ०८ | ०७ | २०२० |
| | नोंदणी तारीख | : | ०८ | ०७ | २०२० |
| | निकाल तारीख | : | २२ | ०५ | २०२५ |
| | कालावधी | : | ०४ व. | १० म. | १४ दि. |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र. ८) बेलापुर यांचे न्यायालयात**
**(पीठासीन अधिकारी श्रीमती पी. जे. शेटटी यांचे समक्ष)**

**नियमित फौजदारी खटला क्र. ४८९/२०२० निशाणी क्र. (४९)**

| | |
|---|---|
| | गुन्हा क्र : I ६८/२०२०<br>पोलिस स्टेशन : रबाळे एमआयडीसी |
| तक्रारकर्ता | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलिस स्टेशन, रबाळे एमआयडीसी पोलीस ठाणे |
| अधिवक्ता | सहा.सरकारी अभियोक्ता श्री. आर. एस. सोनटक्के/श्री होळकर |
| आरोपी क्र. | **अमर दयानंद भांगे**<br>वय- ५५ वर्षे , व्यवसाय- व्यवसाय<br>रा.१३३५, विष्णुनगर, छत्रपतीशिवजी चाळ,<br>रबाळे एमआयडीसी, नवी मुंबई. |
| अधिवक्ता | आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. बी.बी.धुमाळ |

| | |
|---|---|
| घटनेची तारीख | दि.०२-०३-२०२० रोजी १०.३० वाजेच्या सुमारास |
| प्रथम खबरी तारीख | ०२-०३-२०२० |
| आरोपपत्राची दाखल तारीख | ०८-०७-२०२० |
| आरोपपत्र निश्चित केल्याची तारीख | ०३-०५-२०२४ |
| पुरावा सुरू झाल्याची तारीख | ०५.१०.२०२४ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याची तारीख | --- |
| न्यायनिर्णयाची तारीख | २२-०५-२०२५ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख जर असेल तर | निरंक |

| क्र | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | आरोपीने केलेले गुन्हे | निर्दोष किंव्हा दोषी | शिक्षा ठोठावली | कलम ४२८ फौ.प्र.सं च्या उद्देशाने खटलेल्या वेळी |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | अटकेचा कालावधी |
| १. | अमर दयानंद भांगे | ०२-०३-२०२० | ०२-०३-२०२० | भा.द.वि. कलम ३५४, ३२३, ५०६ अन्वये | निर्दोष | - | - |

## न्या य नि र्ण य
## ( घोषणा दिनांक २२/०५/२०२५)

आरोपी हे भारतीय दंड विधान संहिता कलम ३५४, ३२३, ५०६ अन्वये अन्वये निश्चित केलेल्या दोषारोपाच्या संपरिक्षेसाठी प्रस्तुत खटल्यात सामोरे गेले आहेत.

**अभियोग पक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.**

**०२.** दि.०२-०३-२०२० रोजी १०.३० वाजेच्या सुमारास विष्णुनगर ते ईलठणपाडा असा सार्वजनिक रोड येथे फिर्यादी यांचे पती व आरोपी यांचे सन २०१७ रोजी झालेल्या अपघातावरून वाद झाला होता. त्याबाबत पोलिस ठाणेस गुन्हा नोंद आहे. तसेच फिर्यादी या मुलांना शाळेतून आणण्यासाठी इलटणपाडा येथून जात असताना आरोपी हा फिर्यादी यांचे समोरून पायी चालत आला व त्याने फिर्यादीचे साडीचा पदर ओढून फिर्यादीचे छातीकडे वाईट नजरेने बघत फिर्यादींचा विनयभंग केला व फिर्यादी यांचे पती यांचा जीव घेण्याची धमकी दिली, सदरवेळी फिर्यादीचे पती तेथे आले असता त्यांना धक्काबुक्की केली म्हणून त्यांनी आरोपी विरुध्द रबाळे एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली.

**०३.** सदरच्या फिर्यादीवरुन आरोपी विरुध्द गुन्हा क्र. ६८/२०२० भारतीय दंड विधान संहिता कलम ३५४ अन्वये नोंदविण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास सहा.पोलीस निरीक्षक व्ही.आर. पाटील यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले व तपासपूर्ण करुन आरोपीं विरुध्द सदर न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

**०४.** आरोपी विरुध्द भारतीय दंड विधान संहिता कलम ३५४, ३२३, ५०६ अन्वये दोषारोप (नि.१६) निर्धारीत केले. सदर दोषारोप आरोपीला मातृभाषेत समजावून सांगितला असता त्यांनी आरोप नाकारले व खटला चालविण्याची मागणी केली .

प्रस्तुत खटल्यामध्ये सरकारपक्षातर्फे सादर करण्यात आलेल्या पुराव्याअंती आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१) ब अन्वये निवेदन निशाणी क्र. ४७

अन्वये नोंदविण्यात आले. आरोपीने केस खोटी असल्याचा बचाव केला.

०५. **युक्तीवाद, मुददे व निष्कर्ष :-** सरकारपक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्री. आर. एस. सोनटक्के/श्री. होळकर यांचा तोंडी युक्तीवाद ऐकला. आरोपीतर्फे वकील श्री. बी.बी.धुमाळ यांचा तोंडी युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत प्रकरणाच्या न्यायीक निकालासाठी उदभवलेले मुददे, त्यावरील माझे निष्कर्ष व निष्कर्षामागील कारणे खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने सिदध् केले काय की, दि.०२-०३-२०२० रोजी १०.३० वाजेच्या सुमारास विष्णुनगर ते ईलठणपाडा असा सार्वजनिक रोड येथे फिर्यादी यांचे पती व आरोपी यांचे सन २०१७ रोजी झालेल्या अपघातावरून वाद झाला होता. त्याबाबत पोलिस ठाणेस गुन्हा नोंद आहे. तसेच फिर्यादी या मुलांना शाळेतून आणण्यासाठी इलटणपाडा येथून जात असताना आरोपी हा फिर्यादी यांचे समोरून पायी चालत आला व त्याने फिर्यादीचे साडीचा पदर ओढून फिर्यादीचे छातीकडे वाईट नजरेने बघत फिर्यादींचा विनयभंग केला व अशाप्रकारे भारतीय दंड विधान कलम ३५४ नुसार शिक्षापात्र गुन्हा केला ? | ..... नकारार्थी |
| २. | अभियोग पक्षाने सिदध् केले काय की, वरील दिवशी, वरील वेळी, वरील ठिकाणी फिर्यादी या मुलांना शाळेतून आणण्यासाठी इलटणपाडा येथून जात असताना आरोपी याने फिर्यादींचा विनयभंग केला व फिर्यादी यांचे पती यांचा जीव घेण्याची धमकी दिली, सदरवेळी फिर्यादीचे पती तेथे आले असता त्यांना धक्काबुक्की केली व अशाप्रकारे भारतीय दंड विधान कलम ३२३ नुसार शिक्षापात्र गुन्हा केला ? | ..... नकारार्थी |
| ३. | अभियोग पक्षाने सिदध् केले काय की, वरील दिवशी, वरील वेळी, वरील ठिकाणी फिर्यादी या मुलांना शाळेतून आणण्यासाठी इलटणपाडा येथून जात असताना आरोपी याने फिर्यादींचा विनयभंग केला व फिर्यादी यांचे पती यांचा जीव घेण्याची धमकी दिली व अशाप्रकारे भारतीय दंड विधान कलम ५०६ नुसार शिक्षापात्र गुन्हा केला ? | ..... नकारार्थी |
| ४ | अंतिम आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**-: कारणमिमांसा :-**

## अ. अभियोग पक्ष :-

| क्र. | नाव | नि.क्र | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलिस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार ) |
|---|---|---|---|
| ०१ | आशाबाई सुनिल आरन | २० | फिर्यादी |
| ०२ | सुनिल राम आरन | २६ | साक्षीदार |
| ०३ | विजय लालचंद लिलके | २९ | साक्षीदार |
| ०४ | निर्मला भानुदास नेटके | ४१ | साक्षीदार |
| ०५ | विवेक आनंदा दाभोळकर | ४४ | साक्षीदार |

## ब. आरोपीतर्फे साक्षीदार, जर असेल तर :-

| क्र. | नाव | नि.क्र | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलिस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

## क. न्यायालया कडून साक्षीदार, जर असेल तर :-

| क्र. | नाव | नि.क्र | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलिस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार ) |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

## फिर्यादीपक्ष/आरोपी पक्ष/ न्यायालयातील निशाणी क्रमांकांची यादी

## अ. फिर्यादीपक्ष :-

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | २१ | फिर्याद |
| २ | २२ | छापील फिर्याद |
| ३ | ३० | घटनास्थळ पंचनामा |
| ४ | ४५ | १६४ अनव्ये पत्र |
| ५ | ४६ | जबाब नोंदविण्याकरीता पत्रव्यवहार |

## ब.बचाव पक्ष :-

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | निरंक | |

**क. न्यायालय :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | निरंक | |

**०६.** आरोपीविरुध्दचा भारतीय दंड विधान संहिता कलम ३५४, ३२३, ५०६ अन्वये गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाला हे सिध्द करणे गरजेचे आहे की, फिर्यादी या मुलांना शाळेतून आणण्यासाठी इलटणपाडा येथून जात असताना आरोपी हा फिर्यादी यांचे समोरून पायी चालत आला व त्याने फिर्यादीचे साडीचा पदर ओढून फिर्यादीचे छातीकडे वाईट नजरेने बघत फिर्यादींचा विनयभंग केला व फिर्यादी यांचे पती यांचा जीव घेण्याची धमकी दिली, सदरवेळी फिर्यादीचे पती तेथे आले असता त्यांना धक्काबुक्की केली.

**<u>मुददे क्र. १ ते ३ करीता :-</u>**

**०७.** सर्व मुददे एकमेकांशी संलग्न असुन ग्राहय धरला जाणारा पुरावा हा देखील सारख्याच स्वरुपाचा असल्याने सर्व मुददांचा एकत्रित विचार करणे न्यायोचित ठरते. आरोपींवरील दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३५४, ३२३, ५०६ अन्वये गुन्हा केला हे सिध्द करणे आवश्यक आहे.

**०८.** अभियोग पक्षामार्फत आरोपी विरूध्द आरोप सिध्द करण्याकरिता फिर्यादी (साक्षीदार क्र ०१) आशाबाई सुनिल आरन यांना निशाणी २० अन्वये तपासण्यात आले असुन त्यांनी त्यांचे साक्षीत कथन केले की, सन २०२० मध्ये ते विष्णुनगर येथे राहण्यास होते. दि. ०२.०३.२०२० रेजी ते त्यांच्या मुलाला इलटनपाडा येथून शाळेतून दुपारी १२.३० च्या सुमारास आणण्याकरीता पायी चालले होते. तसेच त्यांनी परत घडल्याची वेळ १०.३० वाजता चालले असल्याचे त्यांनी सांगितले. आरोपी हा त्यांच्यासमोरून जात होता. त्याने त्यांचा पदर ओढला. तसेच त्यांनी धमकी दिली की, त्यांच्या नव-याचा मर्डर करेल. सदर वेळेस त्यांचे पती इलटनपाडाकडून येत होते. त्यांच्या पतीने काय झाले याबाबत विचारण केली असता त्यांनी झालेला प्रकार सांगितला. तेव्हा आरोपीने त्यांच्या पतीला धक्काबुक्की केली होती. त्यामुळे त्यांनी आरोपीविरूध्द तक्रार केली व त्यावेळेस आरोपी हा त्यांच्या छातीकडे वाईट नजरेने

बघत होता. तसेच कलम १६४ सीआरपीसी प्रमाणे त्यांचा जबाब ( नि क्र २३) नोंदवून घेण्यात आला होता. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलतपासात सदर फिर्यादीने मान्य केले की, त्या पोलिस स्टेशनला ११ वाजता गेल्याव लगेचच फिर्याद दाखल केली असून त्यानंतर त्या पोलिस स्टेशनला गेल्या नाही हे मान्य केले. सदर साक्षीदाराने त्या आरापीला व आरोपी त्यांना ओळखत नव्हता हे मान्य केले. तसेच त्यांचे पती व आरोपीमध्ये भांडणे आहे व त्यांच्यामध्ये केस चालु आहे याबाबत त्यांना माहिती होते. तसेच त्यांनी पुढे मान्य केले की, सदर दिवशी आरोपी पोलिस स्टेशन मध्ये त्यांच्या पतीविरूध्द तक्रार देण्यासाठी गेला होता. साक्षीदाराने मान्य केले की, जसा पोलिसांसमोर जबाब दिला आहे, तसा न्यायालयासमोर जबाब दयायचा असे त्यांना सांगण्यात आले होते. तसेच आरोपी व त्यांचे भांडण असल्यामुळे त्यांचे एकमेकांमध्ये दुष्मनी आहे. आरोपी व त्यांचे पूर्ववैमन्स्य असून ज्या दिवशी फिर्यादीने तक्रार दाखल केली त्या दिवशी आरोपी देखील फिर्यादी पोलिस स्टेशनमध्ये होता. यावरून सदरची तक्रार त्यांच्या पतिविरोधात तक्रार देण्याकरीता पोलिस स्टेशन येथे होता हे स्पष्ट होते. अभियोगपक्षाचा साक्षीपुरावा काळजीपूर्वक पाहणे आवश्यक असून केवळ फिर्यादीचे साक्षीजबाबावर अवलंबून सदरील आरोप शाबित झाले म्हणणे यथायोग्य होणार नाही. सबब इतर साक्षीदाराच्या साक्षीजबाबाचे अवलोकन करणे आवश्यक आहे.

**०९.** अभियोग पक्षामार्फत आरोपी विरूध्द आरोप सिध्द करण्याकरिता साक्षीदार क्र. २ सुनिल राम आरन यांना निशाणी २६ अन्वये तपासण्यात आले असुन त्यांनी त्यांचे साक्षीत कथन केले की, सन २०२० मध्ये ते विष्णुनगर येथे राहण्यास होते. आरोपी हा त्यांच्या परिसरात राहत असल्याने त्यांना ओळखतात. तसेच ते रिक्षाचालविण्याचा व्यवसाय करत असल्याचे त्यांनी सांगितले. दि. ०२.०३.२०२० रोजी ते त्यांची रिक्षा घेउन सकाळी १२.०० च्या सुमारास इलटनपाडा येथून कळवा येथे जाण्याकरीता निघाले होते. तेव्हा त्यांची पत्नी इलटनपाडा येथे त्यांच्या मुलांना शाळेतून घेण्याकरीता येत होती. आरोपी यांनी तिचा पदर ओढला व तिला धमकी दिली की केस परत घे नाहीतर तुझया नव-याला मारून टाकेन व त्यांच्या छातीकडे बघीतले असे त्यांच्या पत्नीने त्यांना सांगितले. त्यावेळी त्यांच्यामध्ये धक्काबुक्की झाली व तेथे निर्मला मावशी व सिताबाई कांबळे यां बसल्या असल्याचे सांगितले. त्यांनतर त्यांनी पोलिस स्टेशन येथे तक्रार दाखल केल्याचे सांगितले. आरोपीतर्फे घेण्यात

आलेल्या उलतपासात सदर फिर्यादीने मान्य केले की, सदर घटनेपुर्वी त्यांनी आरोपीविरूध्द दाखल केलेल्या गुन्हा क्र ३२/२०१७ या केसमध्ये त्यांची जबानी झालेली आहे. त्यांनी पुढे मान्य केले की, आरोपीने त्यांना केस माघारी घेण्याबाबत दिलेल्या धमकीबाबत त्यांनी आरोपीविरूध्द कोणत्याही प्रकारची एनसी दाखल केलेली नाही. तसेच सदर दिवशी त्यांच्यामध्ये धक्काबुक्की झाली होती ही बाब मान्य केली. तसेच साक्षीदार निर्मला व सिताबाई या त्यांच्या चांगल्या परिचयाचे असल्याची बाब त्यांनी मान्य केली व सदर दिवशी त्यांचे दरम्यान झालेल्या धक्काबुक्कमुळे आरोपी याने त्यांच्याविरोधात फिर्याद करू नये म्हणून सदरची फिर्याद दाखल केली हि बाब नाकारली. एकंदरीतच फिर्यादी व आरोपी यांचे दरम्यान पूर्ववैमनस्य व सदर दिवशी धक्काबुक्की झाली हे मान्य केले. तसेच सदर साक्षीदाराचे साक्षी जबाबावरून घटना त्याच्या समक्ष झाले असल्याचे दिसून येत नाही. तसेच सदर साक्षीदार हा फिर्यादी यांचा पती असून फिर्यादी व आरोपीदरम्यान पूर्ववैमनस्य असल्याने तसेच तो स्वारस्य असणारा साक्षीदार असल्याने पूर्णत: त्यांच्या साक्षीजबाबावर अवलंबून राहण्यास योग्य होणार नाही.

**१०.** अभियोग पक्षामार्फत आरोपी विरूध्द आरोप सिध्द करण्याकरिता (साक्षीदार क्र ०३) विजय लालचंद लिलके यांना निशाणी २९ अन्वये तपासण्यात आले असुन त्यांनी त्यांचे साक्षीत कथन केले की, दि. ०२.०३.२०२० रोजी त्यांना पोलिसांनी विष्णुनगर येथे निर्मला नेटके यांच्या घरासमोर बोलावले होते. सदर दिवशी सकाळी १०.३० च्या सुमारास मेडीकलला जात असताना आरोपीने एका बाईचा पदर खेचला तसेच त्यांच्या दरम्यान झटापट चालली असल्याचे त्यांनी सांगितले. सदर ठिकाणी ते सोडवण्याठी तेथे गेले होते. तसेच त्यांच्या समक्ष घटनास्थळ पंचनामा ( नि क्र ३०) तयार करण्यात आला होता. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलतपासात सदर फिर्यादीने मान्य केले की, सदर प्रकरणात पोलिसांना जबाब देतेवेळेस आरोपीने सदर महिलेचा पदर खेचला हे त्यांनी सांगितले नव्हते. त्यांनी पुढे मान्य केले की, ते पोलिसांना मदत करत असतात. तसेच सदरचा पंचनामा कोणी तयार केला हे त्यांना माहिती नसल्याचे त्यांनी सांगितले. एकंदरीतच दिलेल्या साक्षीजबाबावरून तफावतीमुळे व न्यायालयासमोरील जबाबातील महत्तवपूर्ण सुधारणा केल्यामुळे सदरचा जबाब हा विश्वासार्ह वाटत नाही.

**११.** अभियोग पक्षामार्फत आरोपी विरूध्द आरोप सिध्द करण्याकरिता साक्षीदार क्र. ४

निर्मला भानुदास नेटके यांना निशाणी ४१ अन्वये तपासण्यात आले असुन त्यांनी त्यांचे साक्षीत कथन केले की, आरोपी हे त्यांच्याच परिसरात राहत असल्याने ते त्यांना ओळखतात. दि. ०२.०३.२०२० रोजी ते व सिताबाई कांबळे हे त्यांच्या घराच्या दारात उभे होते. तसेच आशाबाई आरण ही त्यांच्या मुलाच्या शाळेत आधार कार्डच्या कामानिमित्त चालली होती. त्यावेळी समोरून आरोपी आला व ते पिलेल्या अवस्थेत होता. तसेच त्यांनी आशाबाई आरण यांच्या छातीस हात लावून साडीच्या पदराला हात लावून धक्काबुक्की केली. तसेच तिला तुझया नव-याला केस माघे घ्यायला सांग नाहीतर त्याचा मर्डर करेल अशी धमकी दिली. त्यानंतर ते फिर्यादी यांच्यासोबत जाउन तक्रार दाखल केली. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलतपासात सदर साक्षीदाराने मान्य केले की, त्यांचे फिर्यादीसोबत चांगले संबंध असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच त्या फिर्यादीसोबत न्यायालयात आल्या असून घटनेदिवशी फिर्यादीसोबत पोलिसस्टेशन गेल्या होत्या व त्यांचा जबाब त्याच दिवशी नोंदविण्यात आला असून त्या पुन्हा पोलिस स्टेशन येथे गेल्या नव्हत्या असे कथन केले आहे. तसेच त्यांनी त्यांच्या जबाबात पोलिसांना फिर्यादी ही त्यांच्या मुलाच्या शाळेत आधारकार्डच्या कामानिमित्त चालले असल्याचा मजकूर नमूद नाही. तसेच त्यांच्या पोलिसांच्या जबाबात आरोपीने छातीस हात लावला तिला धक्काबुक्की केली व आरोपी हा दारू पिलेल्या अवस्थेत होता असा मजकूर नमूद नाही. तसेच आरोपीतर्फे विचारण्यात आलेल्या उत्तरसूचक प्रश्नांना त्यांनी नाकारलेले आहे.

**१२.** एकंदरीतच सदर साक्षीदाराने न्यायालयासमोरील जबाबामध्ये महत्तवपूर्ण सुधारणा केल्या असल्याचे दिसून येतात तसेच सदर साक्षीदाराचा १६४ जबाब व न्यायालयासमोरील जबाबमध्ये तफावती दिसून येतात. तसेच तिले फिर्यादी व त्यांच्यादरम्यान चांगले संबंध असून तो फिर्यादीच्या पतीसोबत न्यायालयात साक्ष देण्याकरीता आली हि बाब मान्य केली. फिर्याअभियोग पक्षामार्फत आरोपी विरूध्द आरोप सिध्द करण्याकरिता साक्षीदार क्र. ५ विवेक आनंदा दाभोळकर यांना निशाणी ४४ अन्वये तपासण्यात आले असुन त्यांनी त्यांचे साक्षीत कथन केले की, दि. ०२.०३.२०२० रोजी रबाळे एमआयडीसी पोलिस स्टेशन येथे ठाणे अंमलदार म्हणून दिवसपाळीकरता कार्यरत होते. सदर दिवशी भा.द.स ३५४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदरील गुन्हा त्यांनी स्वत: दाखल केला होता. तसेच तपासादरम्यान घटनास्थळाचा पंचनामा ( नि क्र ३०) तयार करण्यात आला होता. त्यांनतर

फिर्यादीचे पती व दोन साक्षीदारांचे जबाब त्यांनी नोंदविले होते. त्यांनतर आरोपीविरूध्द २०१७ मध्ये गुन्हा नोंदविला होता. त्याअनुषंगाने न्यायालयाशी पत्रव्यवहार ( नि क्र ४५) करून फिर्यादी व साक्षीदार यांचे १६४ अन्वये जबाब नोंदविला होता. तसेच साक्षीदाराचा १६४ अन्वये जबाब नोंदविण्यात आला होता. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलतपासात सदर साक्षीदाराने मान्य केले की, साक्षीदार क्र ४ यांनी त्यांच्यासमोर जबाब नोंदवतेवेळी आशाबाई हि तिच्या मुलांच्या शाळेत आधारकार्डच्या कामानिमित्त चालली होती व आरोपी सदर वेळेस पिलेल्या अवस्थेत होता असा कोणताही मजकूर त्यांनी सांगितला नव्हता. त्यांनी पुढे मान्य केले की, सदर साक्षीदाराने फिर्यादीच्या छातीस हात लावला व तिला धक्काबुक्की केली असाही मजकूर सांगण्यात आला नव्हता. सबब सदर साक्षीदारांनी त्यांचे जबाबत महत्तवपूर्ण सुधारणा केले असल्याचे दिसून येते. तसेच तपासी अधिकारी यांनी त्यांच्यातील प्रलंबित केसबददल त्या अनुषंगाने चौकशी केली नसल्याचे दिसून येते. तसेच २०१७ मध्ये आरोपी व फिर्यादी यांचेदरम्यान प्रलंबित केसबाबत चौकशी करण्याकरीता आरोपीला कधीही बोलावले नव्हते. तसेच त्यांना विचारण्यात आलेल्या इतर उत्तरसूचक प्रश्नांना नाकारलेले आहे.

**१३.** अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या फिर्यादीच्या एकंदरीत साक्षी पुराव्या वरुन असे दिसुन येते की, फिर्यादी यांच्या पूराव्याचे अवलोकन केले असता, त्यांचे पती व आरोपीमध्ये भांडणे आहे व त्यांच्यामध्ये केस चालु आहे याबाबत त्यांना माहिती होते. तसेच सदर दिवशी आरोपी पोलिस स्टेशन मध्ये त्यांच्या पतीविरूध्द तक्रार देण्यासाठी गेला होता. तसेच आरोपी व त्यांचे भांडण असल्यामुळे त्यांचे एकमेकांमध्ये दुष्मनी आहे हे मान्य केले असल्याचे दिसून येते. साक्षीदार क्र २ यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांचेदरम्यान पूर्ववैमनस्य असून घटनेदिवशी त्याचे दरम्यान धक्काबुक्की झाली हि बाब शाबीत होते तसेच आरोपीने त्यांना केस माघारी घेण्याबाबत दिलेल्या धमकीबाबात त्यांनी आरोपीविरूध्द कोणत्याही प्रकारची एनसी दाखल केलेली असल्याचे मान्य केले आहे. तसेच साक्षीदार क्र ३ यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, सदर प्रकरणात पोलिसांना जबाब देतेवेळेस आरोपीने सदर महिलेचा पदर खेचला हे त्यांनी सांगितले नव्हते. तसेच ते पोलिसांना मदत करत असल्याचे देखील त्यांनी कथन केले आहे. साक्षीदार क्र ४ यांच्या पुराव्याचे

अवलोकन केले असता,त्यांनी त्यांच्या जबाबात पोलिसांना फिर्यादी ही त्यांच्या मुलाच्या शाळेत आधारकार्डच्या कामानिमित्त चालले असल्याचा मजकूर नमूद नाही. तसेच त्यांच्या पोलिसांच्या जबाबात आरोपीने छातीस हात लावला तिला धक्काबुक्की केली व आरोपी हा पिलेल्या अवस्थेत होता असा मजकूर नमूद नसल्याचे स्पष्ट होते. सबब सदर साक्षीदाराने त्याचे साक्षीजबाबात महत्तवपूर्ण सुधारणा केल्या असल्याने त्याची साक्ष विश्वासार्ह वाटत नाही. अभियोगपक्षामार्फत तपासादरम्यान आलेले साक्षीदार हे सदर घटनेचे प्रत्यक्षदशी्र साक्षीदार होते हि बाब निर्विवादपणे शाबित होत नाही. याउलट फिर्यादी व आरोपी यांचे दरम्यान पूर्वीपासून भांडण असून घटनेदिवशी देखील फिर्यादी यांचे पती व आरोपी यांच्यादरमयान धक्काबुक्की झाली असल्याचे दिसून येते. तसेच आरोपी देखील पोलिस स्टेशन येथे फिर्यादी यांचे पतीविरूध्द तक्रार दाखल करण्याकरीता हजर होता तरी तपासी अधिकारी यांनी त्या अनुषंगाने घटनेचा तपास केला असल्याचे स्पष्ट होत नाही. एकंदरीतरित्या फिर्यादी वआरोपी यांचेदरम्यान भांडण असून अभियोगपक्षामार्फत तपासण्यात आलेल्या साक्षीदार यांचे फिर्यादी व त्यांचे पतीसोबत चांगले संबंध असून त्यांनी त्यांच्या साक्षीजबाबातमहत्तवपूर्ण सुधारणा केल्या असल्याने आरोपीविरूध्द आरोप हे संशयापलीकडे जाउन सिध्द झाले असे म्हणता येणार नाही.

**१४.** त्यामुळे आरोपीवरील आरोप ज्या घटनेवर आधारीत आहेत, ती घटना सबळ पुराव्याअभावी अभियोगपक्षाने सिध्द न केल्याने सदरचे आरोप तंतोतंतपणे सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी झाले आहेत, असे म्हणता येईल. सबब अभियोगपक्षाने आरोपी विरुध्द सदरील गुन्हा साशंकतेच्या पलिकडे जावुन सिध्द करणे आवश्यक असुन त्यात अभियोगपक्ष अपयशी झाला. तसेच यावरुन सदर घटनेशी आरोपीचा संबंध प्रस्थापित करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे, असे ही स्पष्ट होते. प्रस्तुत खटल्याबाबत पोषक असा पुरावा अभियोगपक्षाने न दिल्याने प्रस्तुत प्रकरणातून आरोपीला निर्दोष मुक्त करणे न्यायोचित ठरते. सबब, मी मुद्दा क्र.०१ ते ०३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ बाबत :-</u>**

**१५.** अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदार यांच्याकडुन गुन्हा सिध्द करणारा कुठलाही सबळ पुरावा न्यायपटलावर आलेला नाही. सबब आरोपी हे निर्दोष मुक्त

होण्यास पात्र आहेत. सबब, वर नमुद चर्चेअंती मुददा क्र.४ च्या अनुषंगाने मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे :-

## —: आ दे श :—

| | |
|---|---|
| १. | आरोपी **अमर दयानंद भांगे** याची भारतीय दंड विधान संहिता कलम ३५४, ३२३, ५०६ या दोषारोपातुन फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम २८४ (१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचा जातमुचलका व जामीन कदबा रदद करण्यात येत आहे. |
| ३. | आरोपींना असा निर्देश करण्यात येतो की, फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ च्या कलम ४३७ (अ) प्रमाणे अपील कोर्टात हजर राहण्याविषयीचे बंधपत्र दयावे. |

**न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित**

**स्वाक्षारित/-**
(श्रीमती. पी. जे. शेट्टी)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(८ वे कोर्ट), बेलापूर, नवी मुंबई.

ठिकाण : सी.बी.डी. बेलापूर
दि. :२२/०५/२०२५